|| अंतरी पेटवु ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

## परिपत्रक

**विषय :- महिलांवर होणा-या हिंसक घटना व लैंगिक छळ संदर्भात "तक्रार निवारण समिती" गठीत करणे बाबत.**

विद्यापीठ परिसरातील विद्यार्थीनी आणि विद्यापीठात कार्यरत असलेल्या महिला तसेच या विद्यापीठाशी सलंग्नीत असलेल्या महाविद्यालयातील महिला कर्मचा-याच्या कामाच्या ठिकाणी, महिलांचे न्यायीक हक्काचे संरक्षण करणे, महिलांचा लैंगिक छळ, हिंसक घटना, अत्याचार संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने मे.सर्वोच्च न्यायालयाने, विशाखा विरुध्द राजस्थान राज्य या याचीकेच्या निकालपत्रात नमुद केलेले मार्गदर्शनपर आदेश व त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.१९ सप्टेंबर, २००६ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय आणि राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांनी या विद्यापीठास निर्गमित केलेले दि.१/१०/२००७ रोजीचे पत्र विचारात घेवुन,

विद्यापीठ परिसरातील विद्यार्थीनी आणि विद्यापीठात कार्यरत असलेल्या महिला कर्मचा-याच्या कामाच्या ठिकाणी होणा-या लैंगिक छळवणुकीस प्रभावीपणे प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने, व त्या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण करण्याकरीता या विद्यापीठाचे दि.११/१२/२००७ रोजीच्या परिपत्रकान्वये गठीत केलेली समिती संपुष्टात आणून मा.कुलगुरु महोदयांनी खालील सदस्यांची समिती पुनर्गठीत केलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा.सौ.मंगला ए.साबद्रा, मा.व्य.प.सदस्य,<br>जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट धुळयाचे<br>झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे | - | अध्यक्ष |
| २) | प्रा.डॉ.श्रीमती शोभा शिंदे<br>तौलनिक भाषा व वाङ:मय विभाग,उमवि, जळगाव | - | सदस्य |
| ३) | डॉ.सौ.आर.एस.बेंद्रे<br>स्कुल आर्फ केमिकल सायन्सेस,उमवि, जळगाव | - | सदस्य |
| ४) | प्रा.रत्ना महाजन<br>डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय,<br>जळगाव | - | सदस्य |
| ५) | डॉ.अमुल बोरसे<br>स्कुल आर्फ केमिकल सायन्सेस,उमवि, जळगाव | - | सदस्य |
| ६) | डॉ.एस.ए.टी.सबज्वारी,<br>एस.एस.मणियार लॉ कॉलेज, जळगाव | - | सदस्य |
| ७) | श्री.एस.आर.भादलीकर<br>कायदा अधिकारी, उमवि, जळगाव. | - | सदस्य सचिव |

राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांचे दि.१/१०/२००७ रोजीच्या पत्र - आदेशान्वये, विद्यापीठाशी संलंग्नीत असलेल्या महाविद्यालयांमध्ये सुध्दा या प्रकारची समिती असावी अश्या सुचना दिलेल्या असुन ब-याच सलंग्नीत महाविद्यालयांमध्ये, महिलांवर होणा-या हिंसक घटना व लैगिक छळा संदर्भात प्रत्यक्षात तक्रार निवारण समिती गठीत केली नसल्याचे या विद्यापीठाच्या निदर्शनास आलेले आहे. या संदर्भातील तक्रारी संलग्नीत महाविद्यालयातील महिला कर्मचा-ऱ्यांकडुन विद्यापीठास प्राप्त झालेल्या आहेत.

तरी, उपरोक्त समितीची कार्यकक्षा वाढविण्यात येत असुन, यापुढे, सलंग्नीत महाविद्यालयातील महिला कर्मचा-यांचे न्यायीक हक्काचे सरंक्षण करणे, त्यांच्यावर होणारे अत्याचार, हिंसक घटना, लैगिंक छळवणुकीस प्रभावीपणे प्रतिबंद घालण्याकरीता उपरोक्त समिती गठीत करण्यात आलेली असुन सदरच्या समितीने या संदर्भात प्राप्त होणा-या तक्रारींची दखल घेवुन चौकशीअंती अहवाल मा.कुलगुरु महोदयांकडे सादर करावा.

उपरोक्त समितीचा कार्यकाळ सदरचे परिपत्रक निर्गमित केल्यापासुन पुढील चार वर्ष किंवा मा.कुलगुरु महोदयांचा या संदर्भात पुढील आदेश निर्गमित होई पावेतो यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत राहील.

उपरोक्त परिपत्रक मा.कुलगुरु महोदयांनी निर्गमित केलेल्या आदेशान्वये निर्गमित केले असे.

sd/-

जा.क्र.उमवि/१५/१८३/२००८. (डॉ.मु.व.बरीदे)

दि. २१/११/२००८. कुलसचिव

प्रति,१) मा.अध्यक्ष व मा.सदस्य२) विद्यापीठाशी सलंग्नीत सर्व महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा.प्राचार्य / संचालक ३) विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक प्रशाळा /विभागांचे मा.संचालक/विभागप्रमुख४) विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख